# मुंबई पोलीस शिपाई भरती – २०१८ प्रक्रियेंतर्गत उमेदवारांनी द्यावयाचे हमीपत्र ( Undertaking )

मी श्री/श्रीमती ............................................... अर्ज **क्र.** ............................ **छाती क्र.** ...................... याद्वारे खालीलप्रमाणे हमीपत्र लिहून देतो/देते आहे.

मुंबई पोलीस शिपाई भरती २०१८ प्रक्रियेंतर्गत माझी ......................... या मागास प्रवर्गातून पोलीस शिपाई पदासाठी निवड झाली असून शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. बीसीसी २०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६ ब, दि. १२ डिसेंबर २०११ मधील निर्देशानुसार माझ्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून माझी वर नमूद पदावर तात्पुरती नियुक्ती करण्यात आली आहे.

२. वर नमूद शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करून घेणे आवश्यक असल्याची बाब नियुक्ती अधिकाऱ्यांनी मला समक्ष सांगितली आहे. यास्तव याद्वारे अशी लेखी हमी देत आहे की, पोलीस शिपाई पदावरील नियुक्ती स्विकारताच माझ्या जातीची वैधता तपासण्यासाठी त्याबाबतचा प्रस्ताव मी संबंधीत जात पडताळणी समितीकडे तात्काळ सादर करून जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकित प्रत मा. पोलीस उप आयुक्त, मुख्यालय २, मुंबई ( कक्ष–९ कनिष्ठ आस्थापना ) यांच्याकडे तात्काळ सादर करीन.

३. जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश माझ्यावर बंधनकाकरक राहतील याची मला जाणीव आहे.

४. जात पडताळणी समितीने माझे जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास, मला दिलेल्या नियुक्तीचे आदेश रद्द होवून माझ्याविरूध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग ( जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार कारवाई होण्यास मी पात्र ठरेन याची मला समक्ष माहिती देण्यात आली आहे.

५. वर नमूद टंकलिखित मजकूर मी स्वत: वाचला असून मी आज दि. .................... रोजी हे हमीपत्र स्वत: देत आहे.

–: **साक्षीदार** :–

| **नाव** | **पत्ता** | **सही/ दिनांक** |
|---|---|---|
| १) ......................................... | ..................................... | |
| २) ......................................... | ..................................... | |

**उमेदवाराची सही व दिनांक**

# मुंबई पोलीस शिपाई भरती – २०१८ प्रक्रियेंतर्गत उमेदवारांनी वाहन चालक कर्तव्याच्या पुर्ततेबाबत द्यावयाचे हमीपत्र ( Undertaking )

**मी** ……………………………………………, **अर्ज क्र.** ……………………………… **छाती क्र.** ………………… स्वेच्छेने असे हमीपत्र देतो/देते की माझी मुंबई पोलीस भरती २०१८ प्रक्रियेंतर्गत '' **पोलीस शिपाई** '' पदावर अंतिम गुणवत्ता यादीनुसार निवड झाली आहे.

२. मुंबई पोलीस शिपाई भरती २०१८ च्या जाहिरातीत नमुद केलेल्या अटीनुसार पोलीस शिपाई पदी नियुक्ती झाल्यावर वाहन चालकाचे कर्तव्य बजावणे बंधनकारक राहील तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने वाहन चालकाच्या कर्तव्याच्या अनुषंगाने वेळोवळी काढलेले आदेश बंधनकारक राहतील याची मला जाणीव आहे.

३. मी स्वेच्छेने असे हमीपत्र ( **Undertaking** ) लिहून देतो / देते की, पोलीस विभागामध्ये वाहन चालकाचे पद स्वतंत्रपणे भरले जात नसल्यामुळे पोलीस शिपाई वाहन चालकाचे काम करण्यास तयार आहे. भविष्यात याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही हे मी स्वखुशीने व समजुतीपुर्वक लिहून देत आहे.

*४. माझाजवळ मोटार ड्रायव्हिंग लायसन्स क्र. ……………………………………( **Valid upto** ) असून मी केव्हाही आदेशानुसार चालक शिपाई म्हणून ड्रायव्हिंगचे कर्तव्य बजावेन.

*५. महाराष्ट्र पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम–२०११ मधील तरतुदीनुसार पोलीस शिपाई पदाच्या भरतीमध्ये अर्ज करताना उमेदवाराकडे हलकी वाहन चालविण्याचा (LMV) चालवण्याचा परवाना धारण करणे आवश्यक आहे. सदर अर्हता अनिवार्य असल्याबाबत मला जाणीव आहे. तसेच सदरहू परवाना धारक नसल्यास नियुक्ती नंतर पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर **दोन वर्षांच्या आत** परवाना धारण करण्यात येईल व त्या कालावधीत हा परवाना धारण न केल्यास निवड रद्द करून सेवा समाप्त करण्यात येईल, याबाबतचे बंधपत्र सादर केल्यास असा उमेदवार या पदासाठी अर्ज करण्यास पात्र राहील, याबाबत पूर्तता करणे अनिवार्य आहे. मी आदेशानुसार केव्हाही चालक शिपाई म्हणून कर्तव्य बजावेन तसेच वाहन चालकाच्या प्रशिक्षणाबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले आदेश माझ्यावर बंधनकारक असतील.

ठिकाण :
दिनांक :

**उमेदवाराची सही व दिनांक**

**–: साक्षीदार :–**

| नाव | पत्ता | सही/ दिनांक |
|---|---|---|
| १) …………………………………… | ……………………………… | |
| २) …………………………………… | ……………………………… | |

*** आवश्यक नाही ते खोडावे**